M-Tech

62

Dr. S. S. LIMAYE 0712-2583237 (34)

ATTN: SHULKA SAMITI
'A' Grade to Ramdeobaba
K.N. Engg. College, Nagpur.

**ANNEXURE B1**

राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांचे
गुणात्मक व दर्जानिहाय वर्गीकरण

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय. क्रमांक : टीईएम-२००४/(२९९/०४)/तांशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १ जुलै, २००४

संदर्भ : १) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
क्र.पीईसी-२००३/(२१२/०३)/तांशि-१, दि.११ ऑगस्ट,२००३
२) संचालक तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई १ यांचे
क्र.२/एनजीसी/२००४/दर्जानिहाय वर्गीकरण/२३०७,दिनांक८ जून,
२००४ चे पत्र.

शासन निर्णय :- सन २००३-०४ पासून दोन वर्षासाठी राज्यातील अभियांत्रिकी महाविद्यालयांचे गुणात्मक आणि दर्जानिहाय वर्गीकरणास संदर्भाधीन दिनांक ११ ऑगस्ट,२००३ च्या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात आली आहे. यामधील ज्या अभियांत्रिकी महाविद्यालयांना "ब " ते " ई " दर्जा देण्यात आला आहे अशा संस्थांनी तसेच ज्या संस्थांचा दर्जा प्रसिध्द करण्यात आलेला नाही त्या संस्थांनी जर पुढील शैक्षणिक वर्ष २००४-०५ साठी, त्यांच्या संस्थेचे दर्जानिहाय वर्गीकरण करण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे पुन्हा अर्ज केल्यास व शासनाने विहीत केलेले शुल्क भरल्यास त्यांना दर्जा उंचावण्यास पुन्हा संधी देण्यात येईल. असे स्पष्ट करण्यात आले आहे.

त्यास अनुसरुन संदर्भाधीन दि.११ ऑगस्ट,२००३ च्या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्ट " अ " मधील विभागीय कार्यालय, मुंबई येथील अनुक्रमांक-१२ व विभागीय कार्यालय, नागपूर येथील अनुक्रमांक ७ मध्ये दर्शविलेल्या संस्थांनी दर्जा उंचावण्यासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे अर्ज केले होते. तसेच २ महाविद्यालयांनी प्रथमच दर्जानिहाय वर्गीकरणासाठी तंत्रशिक्षण संचालनालयाकडे अर्ज केला होता. या चार महाविद्यालयांची तंत्रशिक्षण संचालनालयाने तपासणी करुन संचालनालय स्तरावर समिती गठीत करुन, त्यांनी संबंधित ४ संस्थांना जो सुधारित दर्जा दिला आहे त्यास शासनाकडून मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. आता या शासन निर्णयान्वये खालील ४ संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सुधारीत दर्जा देण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे.:-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | यापूर्वी संस्थेला दर्जा मिळाल्याचे वर्ष व मिळालेला दर्जा | सुधारीत दर्जा |
|---|---|---|---|
| १. | विद्यावर्धिनीचे कॉलेज ऑफ इंजिनियरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी, वसई, मुंबई | " क " दर्जा २००३ | " अ " दर्जा |
| २. | रामदेव बाब कमला नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर | " ब " दर्जा २००३ | " अ " दर्जा |

SHRI RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT ★ NAGPUR

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | श्री.विठ्ठल एज्युकेशन रिसर्च इन्स्टिट्यूटचे कॉलेज ऑफ इंजि., ता.पंढरपूर, जि.सोलापूर | -- | " अ " दर्जा |
| ४. | पद्मश्री डॉ.डी.वाय.पाटील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनियरींग ॲण्ड टेक्नॉलॉजी पिंपरी, पुणे | -- | " अ " दर्जा |

मात्र सदर दर्जा हा २००४-०५ पासून दोन वर्षासाठी राहील तसेच संस्थांना प्रदान करण्यात आलेल्या दर्जाचे पुनर्विलोकन दर २ वर्षानंतर करण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( श्या. र. चौरे )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई / पुणे / नागपूर
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता )
~~[illegible]~~
निवड नस्ती तांशि-१

प्रत,
१) अतिरिक्त सचिव (तांत्रिक) भारत सरकार अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, इंदिरा गांधी स्टेडियम परिसर, इंद्रप्रस्थ इस्टेट, नवी दिल्ली ११०००
२) सहाय्यक शिक्षण सल्लगार (तांत्रिक) भारत सरकार मनुष्यबळ विकास मंत्रालय, (शिक्षण विभाग) पश्चिम क्षेत्रीय कार्यालय, इंडस्ट्रीयल इन्श्युरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT
NAGPUR

MTech VLSI . ANNEXURE B/ 40 (36)

तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६३०६०२, २२६४१२५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
तार - EDUTECH   E-mail : Desk2@dte.org.in   Internet : http://www.dte.org.in

क्रमांक- एमएनटीसी/२००४/२३२
दिनांक - १३ ऑगस्ट २००४

प्रति
प्राचार्य,
श्री. रामदेवबाबा कमला नेहरु इंजि.कॉलेज,
काटोल रोड नागपूर-१३.

विषय:- शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून एम.ई./ एम.टेक. व एम.फार्म. अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता देण्याबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय क्र. टिईएम-२००४/(४१०/०४)/तांशि-१, दि.१२ ऑगस्ट २००४

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, संदर्भाधीन शासन निर्णयाद्वारे शासनाने आपल्या शैक्षणिक वर्ष २००४-२००५ पासून खालील नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र | अभ्यासक्रम | प्रवेश क्षमता | निश्चित ठेवीची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | (व्हीएलएसआय / डीएसपी / ...) एम.टेक | १८<br>(१० खुला +<br>५ नामनिर्देशित +<br>३ एस.सी./एस.टी.) + | रु. २.०० लाख |

तरी सदर अभ्यासक्रमासाठी संचालक, तंत्र शिक्षण म.रा.मुंबई व संस्थाचालक यांच्या संयुक्त खात्यात नॅशनलाईज किंवा शेडयुल बँकेत एकूण रु. २.०० लाख ५ वर्ष मुदतीसाठी जमा करावेत व सोबत जोडलेल्या नमुन्यात रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नोंदणीकृत हमीपत्र दोन प्रतीत या संचालनालयाला सादर करावे. नोंदणीकृत हमीपत्रासोबत संस्थेमध्ये सदर अभ्यासक्रमासाठी नियुक्ती केलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांची नांवाची यादी सोबत जोडण्यांत यावी. तसेच ग्रंथालयामध्ये पुस्तके,जर्नल्स इ.ची संख्या किंवा पुस्तके खरेदी करण्यांत आलेली किंमत व अभ्यासक्रमासाठी इतर साधनसामग्री खरेदी केल्याची यादी व त्यांची किंमत याबाबतची सर्व माहिती सादर करावी. त्यानंतरच अभ्यासक्रम सुरु करण्याची या संचालनालयाची अंतिम परवानगी देण्यात येईल. या संचालनालयाची अंतिम परवानगी मिळाल्याशिवाय विद्यार्थ्यांना प्रवेश देऊ नयेत याची नोंद घ्यावी. सदर अभ्यासक्रमाचे प्रवेश गुणवत्तेनुसार करण्यांत यावेत व प्रवेश प्रक्रियेत पारदर्शकता ठेवावी.

(सही)
(ज.र. डोंगरे)
सहाय्यक संचालक,तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य मुंबई.

प्रत :- १) मा. कुलगुरु, नागपूर विद्यापीठ ,नागपूर यांना माहितीसाठी सादर. त्यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त रक्कम संस्थाचालकांच्या संयुक्त खात्यात जमा केल्याची खात्री केल्याशिवाय विद्यार्थ्यांचे एनरोलमेंट करु नये.
२) सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर यांना माहितीसाठी. तसेच त्यांना कळविण्यात येते की संयुक्त खात्यात पैसे भरल्याची खात्री केल्याशिवाय गुणवत्ता यादी प्रमाणित करु नये.

C:\My Documents\JADHAV M R\orders\Deposit 2004-2005.doc

RAMDEOBABA COLLEGE OF ENGINEERING & MANAGEMENT NAGPUR

Shri Ramdeobaba College of Engineering & Management * Nagpur

राज्यातील शासकीय व खाजगी संस्थांना सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासुन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मंजूरी देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,

शासन निर्णय, क्रमांक-टिईएम २३/००/(४४२/००)तांशि.१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२

दिनांक :- ऑक्टोबर,२०००

संदर्भ:- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची क्रमांक एफ-६२६०/१३/एआयबीपीजी/एपीपी/२के, दिनांक ४ सप्टेंबर, २००० ची पत्रे

शासन निर्णय:- अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी त्यांच्या संदर्भाधीन दिनांक ४ एप्रिल, २००० च्या पत्रान्वये शासकीय व खाजगी संस्थाना काही अटी व शर्तीवर सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासुन पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी मान्यता दिलेली आहे. सदर मान्यता विचारात घेऊन सदर संस्थांना त्याप्रमाणे मान्यता देण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२ आता या शासन निर्णयान्वये खालील संस्थांना त्यांच्या नांवासमोर दर्शविलेला पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सन २०००-२००१या शैक्षणिक वर्षापासुन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून सुरु करण्यास मान्यता देण्यात येत आहे. :-

| अ.क्र. | संस्थेचे नांव | अभ्यासक्रम | प्रवेशक्षमता |
|---|---|---|---|
| १) | शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद | कॉम्प्यूटर सायन्स ॲन्ड इंजि. (एम.ई.)अर्धवेळ | १५ |
| २) | श्री. रामदेवबाबा कमला नेहरु अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर | जिओ टेक्नीकल इंजि. (एम.टेक.)अर्धवेळ | १५ |
| ३) | महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी, पुणे | पॉलिमर इंजि.(एम.ई.)पुर्णवेळ | १०<br>५+३+२ |
| ४) | पुणे इन्स्टिटयूट ऑफ कॉम्प्यूटर टेक्नॉलॉजी, पुणे | कॉम्प्यूटर इंजि. (एम.ई.)पुर्णवेळ | १८<br>१०+५+३ |
| ५) | के.एम.कुंदनानी कॉलेज ऑफ फार्मसी , मुंबई | फार्माकॉलॉजी (एम. फार्म)पुर्णवेळ | ०५<br>२+२+१ |

तसेच सदर मान्यता ही खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून देण्यात येत आहे. :-

१) सदर मान्यता ही कायम विनाअनुदान तत्वावर राहील.

२)प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच शासनाने दिनांक २१.५.१९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संस्थेस बंधनकारक राहील.

नौंदणी लिपिक,
रा. ना. ने. सं.
नागपूर-१३.

Submitted for organization of state govt

NAGPUR